दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १०९ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.१३ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


## त्यांनी फक्त तिजोऱ्या भरल्या

# देशाची वाटचाल आता संकल्पाकडून सिद्धीकडे : पंतप्रधान



**मुंबई**–देशावर अनेक दशके राज्य करणाऱ्यांनी करदात्यांचा पैसा आणि वेळ या दोन्ही गोष्टींची पर्वा केली नाही. त्यांची नीती आणि निष्ठा नेहमीच प्रश्नांच्या फेऱ्यात सापडली. सत्ता मिळवायची, मतांचे राजकारण करायचे, स्वत:च्या तिजोऱ्या भरायच्या आणि परिवाराचे हित साधायचे हेच त्यांचे धोरण होते. आम्ही मात्र देशाचा विकास करत आहोत, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी नवी मुंबई येथे केले.

आमची धोरणे आणि निष्ठा देशाशी बांधील आहेत. आधीच्या सरकारकडून प्रकल्प रखडविले गेले, आम्ही ते सुरू केले आणि पूर्णही केले. त्यामुळे देशाची वाटचाल संकल्पाकडून सिद्धीकडे सुरू असल्याचा दावाही मोदी यांनी केला.मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एमएमआरडीए) उभारण्यात आलेल्या देशातील सर्वात मोठया शिवडी–न्हावाशेवा 'अटल सेतू' प्रकल्पाचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उलवे येथील नवी मुंबई विमानतळ प्रकल्पाच्या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात खारकोपर–उरण रेल्वे मार्ग, दिघा गाव रेल्वे स्थानक, बेलापूर–पेंढर नवी मुंबई मेट्रो मार्गिकेसह अन्य प्रकल्पांचे लोकार्पण मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी दक्षिण मुंबईतील ऑरेंज गेट ते मरिन ड्राइव्ह दरम्यान उभारण्यात येणाऱ्या महत्त्वाकांक्षी भुयारी मार्ग प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले.राज्य सरकारच्या महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत लेक लाडकी योजनेचा शुभारंभही या वेळी करण्यात आला. या वेळी बोलताना पंतप्रधानांनी विरोधकांवर हल्ला चढवतानाच देशात उभे राहाणारे विकास प्रकल्प हे नव्या भारताची पायाभरणी करणारे ठरतील, असा विश्वास व्यक्त केला.यापूर्वीच्या काळात एखादा प्रकल्प एक तर प्रत्यक्षात येत नसे अथवा अनेक दशके लटकत राहत असे. दहा वर्षांपूर्वी जुन्या सत्ताधाऱ्यांच्या काळात हजारो, लाखो कोटी रुपयांच्या मेगा घोटाळय़ांची चर्चा होत असे. आता मात्र आपण हजारो, लाखो कोटी रुपयांचे विकास प्रकल्प पूर्ण केल्याची चर्चा करतो. हाच मोठा फरक आहे, असेही मोदी म्हणाले.अटल सेतूचे लोकार्पण होणे हा एक ऐतिहासिक क्षण आहे. या प्रकल्पाच्या भूमिपूजनाला मी आलो होतो तेव्हा छत्रपती शिवाजी महाराज यांना नमन करत संकल्प केला होता की देशाला बदलायचे, देशाला पुढे न्यायचे. कारण याआधीच्या सरकारने प्रकल्प अडविण्याचेच काम केले. त्यांच्या काळात मोठे प्रकल्प होतील असे वाटत नव्हते. पण २०१४ मध्ये मोदी गॅरंटी आली. जेथे सगळय़ांच्या आशा संपतात तिथे मोदी गॅरंटी सुरू होते, असा दावा पंतप्रधानांनी केला.देशात ज्या प्रकारे आम्ही विकासाचे इमले रचत आहोत तसेच काम राज्यात डबल इंजिन सरकारच्या माध्यमातून केले जात आहे, असे सांगत पंतप्रधानांनी महायुती सरकराचे कौतुक केले. मुंबई, महाराष्ट्राच्या विकासाचे ३३ हजार कोटींचे प्रकल्प सुरू आहेत. महाराष्ट्रात पहिल्यांदा डबल इंजिन सरकार बनले तेव्हा हे प्रकल्प सुरू झाले याचा आवर्जून उल्लेख त्यांनी या वेळी केला.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवडी–न्हावाशेवा सागरी सेतूचे लोकार्पण केल्यानंतर त्यावरून त्यांनी प्रवास केला आणि नवी मुंबईतील चिर्ले येथे पोहोचले. या वेळी त्यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना बरोबर घेतले होते. पंतप्रधानांनी रोड शो करीत विशेष रथातून थेट मंडपात प्रवेश केला. सागरी सेतूने चिर्लेला आल्यानंतर पंतप्रधान फुलांनी सजवलेल्या एका रथातून कार्यक्रमस्थळी पोहोचले. या वेळी रस्त्याच्या दुतर्फा त्यांच्या स्वागतासाठी ढोल, ताशे तसेच आगरी–कोळी समाजातील पारंपरिक नृत्याचे सादरीकरण करण्यात आले.

## सरपंच आणि पोलीस पाटलांचे प्रमाणपत्र द्या अन जातीचा दाखला घ्या

### माडिया व कोलाम समाजातील लोकांना मोठा दिलासा

**गडचिरोली । प्रतिनिधी**

आदिवासी समाजातील काथोडी, कातकरी, ढोरकातोडी, ढोरकातकरी, सोनकाथोडी, सोनकातकरी या अनुसूचित जमातीच्या धर्तीवर माडिया व कोलाम या आदिम जातींना अनुसूचित जमातीचे दाखले मिळण्याचा मार्ग आता सुकर झाला आहे. या समाजातील अनेकांकडे विविध कागदपत्रे नसल्यामुळे जात प्रमाणपत्रे मिळण्यास अनेक अडचणी येत होत्या. त्यामुळे आदिवासी विकास विभागाने १० जानेवारी रोजी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता गावातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व पोलीस पाटील यांच्या दाखल्यावरच जात प्रमाणपत्रे मिळणार आहेत.ज्या कुटुंबातील पहिली पिढी शिकते, ज्यांची स्थावर मालमत्ता नाही, अशा मागास घटकांकडून पुरावे देणे शक्यच नाही. विशेष म्हणजे अनुसूचित जमातींना १९५० चा पुरावा दिल्याशिवाय जात प्रमाणपत्र मिळत नाही. त्यामुळे माडिया व कोलाम जमातीच्या लोकांना अनेक शासकीय योजनांपासून वंचित रहावे लागत होते. गडचिरोली जिल्ह्यात माडिया समाज मोठ्या प्रमाणात आहे.या ठिकाणी देखील आजही अनेकांकडे जातीचे दाखले नाहीत. ही बाब लक्षात येताच गडचिरोलीसह,अहेरी आणि भामरागड तिन्ही प्रकल्प अधिकाऱ्यांनी नुकतेच आदिवासी विकास विभागाला याबाबत मार्गदर्शन मागवले होते. शिवाय प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुलभ करावी अशी विनंती देखील केली होती. या साठी जिल्हाधिकारी संजय मिणा आणि मुख्यकार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांनीही पाठपुरावा केला होता. अखेर आदिवासी विकास विभागाने माडिया व कोलाम या जातींचे प्रमाणपत्र देण्यासाठी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व पोलीस पाटील यांचे देखील दाखले ग्राह्य धरण्याचे आदेश दिले आहेत.जिल्ह्यातील गडचिरोलीसह,अहेरी व भामरागड या आदिवासी एकात्मिक प्रकल्प अधिकाऱ्यांना याबाबतचे आदेश आदिवासी विकास विभागाने जारी केले आहेत. जातीचा दाखल्यासाठी कोलाम व माडिया या जातीच्या व्यक्तींनी तहसील कार्यालयात अर्ज सादर केल्यावर संबंधित तहसील कार्यालय ज्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात असतील त्या कार्यालयाशी संपर्क साधून वस्ती व पाड्यावर जाऊन पडताळणी करण्यात येणार आहे. संबंधित गावात कोलाम व माडिया या जमातीच्या समाजाचे सरपंच किंवा ग्रामपंचायत सदस्य पोलीस पाटील यांनी दिलेले दाखले देखील जातीचे प्रमाणपत्र देण्यास ग्राह्य धरण्यात येणार आहेत. ही सवलत यापूर्वी देण्यात आलेल्या कातकरी जमाती व्यतिरिक्त केवळ कोलाम व माडिया जमाती करिता लागू राहणार असे त्या पत्रात म्हटले आहे.

## भगवान विद्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी




**बीड । प्रतिनिधी**

भगवान विद्या प्रसारक मंडळ बीड संचालित भगवान विद्यालयात राष्ट्रमाता राजमाता जिजाऊसाहेब आणि युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे उपमुख्याध्यापक एल.एस. भोंडवे, पर्यवेक्षिका संध्याताई सानप व प्रभारी पर्यवेक्षक आघाव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते .याप्रसंगी जेष्ठ अध्यापक गर्जे व ठोसर मंचावर उपस्थित होते . अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे प्रथम पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक प्रतिनिधी म्हणून गर्जे व ठोसर यांनी राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकणारे मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायली पवार व स्नेहा वाघमारे यांनी केले तर सीमा बांगर यांनी आभार प्रदर्शन केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाल.

## घुग्घूस शहर व ग्रामीण भागातील भूमिपुत्र, शेतकरी, बेरोजगारांच्या विविध मागण्यांवर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

घुग्घूस शहर, ता. चंद्रपूर येथील भूमिपुत्र युवा संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना एक निवेदन दिले आहे. या निवेदनात संघटनेने घुग्घूस शहर व ग्रामीण भागातील भूमिपुत्र, शेतकरी, बेरोजगारांच्या विविध मागण्यांबाबत सादर केल्या आहेत.

या मागण्यांमध्ये घुग्घूस शहर व ग्रामीण भागातील स्थानिक सुशिक्षित व बेरोजगार युवक व युवतींना त्यांच्या शिक्षणानुसार नोकरीत सामावून घेणे, लाईट्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनीच्या वतीने मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देणे, लाईट्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनीच्या प्रदूषणामुळे लोकांना अनेक आजारांचा सामना करावा लागतो, म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने चौकशी करून कंपन्यांवर कारवाई करणे, लाईट्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनीच्या माध्यमातून अनेक वर्षापासून घुग्घूस ते पांढरकवडा पांदन रस्ता आणि घुग्घूस ते सेनगाव पांदन रस्तावर केलेला अतिक्रमण हटवणे, लाईट्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनीने शहर व ग्रामीण भागात सन २०१३ पासून ते आजपर्यंत सी एस आर फंडातून केलेल्या खर्चाची कार्याची चौकशी करणे, जिल्हाधिकारी यांनी सदर लाईट्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनीच्या भोंगळ कारभाराची सखोल चौकशी करून कारवाई करणे, विस्तारीकरणात ज्या शेतकऱ्याच्या जमिनी कंपनी अधिग्रहित करते त्या जमिनींचा मोबदला हा शेतकऱ्यांना थेट मिळावा, कंपनीचे अधिकारी यांनी विस्तारीकरणाच्या जनसुनानीच्या नोटिफिकेशनमध्ये जाहीरपणे सांगितले की कंपनीच्या परिसरात किमान दोन लाख वृक्षारोपण करण्यात आले असे खोटे व चुकीची



माहिती सादर केलेल्या कंपनीवर कडक कारवाई करणे, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना कंपनीत कायमस्वरूपी रोजगार देण्यात यावा आणि त्यांना योग्य पगार किमान २० हजार ते २५ हजार रुपये देण्यात यावे, कंपनीची स्थापना ज्यावेळी झाली त्यावेळी अनेक लोकवस्तीचे पुनर्वासन करताना सर्वे क्रमांक १६७ आराजी ६३.६७३७ चौ.मी. एकूण ६२ प्लॉट रहिवासा करिता पुरावतीत आहे. जमिनीचे पट्टे देऊ असे खोटे आश्वासन कंपनी मार्फत देऊन त्या लोकवस्तीना स्थलांतरित करण्यात आले, लाइट्स मेटल अँड एनर्जी लिमिटेड कंपनीचे जड वाहतूक शहराच्या मध्यभागातून होत असल्याने दुर्घटनाला आमंत्रण नाकारता येत नाही. म्हणून कंपनीचे जड वाहतूक शहराच्या मध्यभागातून बंद करण्यात यावे यांचा समावेश आहे.या सर्व मागण्यांवर योग्य निर्णय घेण्यात यावा आणि न्याय द्यावा यासाठी भूमिपुत्रांच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. भूमिपुत्रांच्या वरील मागण्यांवर योग्य ती साकारात्मक चर्चा न झाल्यास दिनांक २९ जानेवारी २०२४ रोजी कंपनीवर धडक मोर्चा काढण्यात येईल, अशी चेतावणी संघटनेने दिली आहे.

## विवेकानंदांचे जीवन भावी पिढीला मार्गदर्शक–प्रदीप पांडे

**पुलगाव । प्रतिनिधी**

विवेकानंदांचे जीवन भावी पिढीला मार्गदर्शक आहे. जग सामाजिक, कौटुंबिक समस्येला सामोरे जात असताना भारताचा आध्यात्मिक विचार जगाला तारणारा आहे. जगातील युवा पिढी तसेच सकारात्मक विचार करणारे नागरिक भारतीय अध्यात्माकडे आशेने बघत आहे. भारताचा धार्मिक व आध्यात्मिक वारसा जगासमोर मांडण्याचे अलौकिक कार्य विवेकानंदांनी केले आहे. त्यामुळे जगातील भावी पिढी विवेकानंदांचे जीवन आदर्शवत मानते. असे प्रतिपादन विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रदीप पांडे यांनी केले.विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेच्या पुलगाव, नाचणगाव,देवळी शाखांमध्ये स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी ते मार्गदर्शन करत होते.विवेकानंद नागरी सहकारी पतसंस्थेच्या मुख्यालयामध्ये स्वामी



विवेकानंदांच्या पुतळ्याला अध्यक्ष प्रदीप पांडे, उपाध्यक्ष बबन बरवड, संचालिका प्रज्ञा हनमंते यांनी माल्यार्पण व पूजन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल लोणकर यांनी प्रास्ताविक केले तर शाखा व्यवस्थापक अरविंद हलमारे यांनी आभार मानले. नाचणगाव शाखेमध्ये झालेल्या कार्यक्रमात शाखेचे संचालक सुभाषराव पेशकर व आशिष एखंडे यांनी विवेकानंदांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण केले. शाखा समिती सदस्य अशोक अवथनकर, अशोक मेहकरे, दिपक बिरे, विजय पोलार, अतुल चांदोरे, व्यवस्थापक विवेक वरकड उपस्थित होते. संचालन संगीता देशमुख यांनी केले तर निखिल धोपाडे यांनी आभार मानले.देवळी शाखेत शाखा व्यवस्थापक नंदकिशोर बोराटणे यांनी शाखा समिती सदस्यांसह विवेकानंद जयंती साजरी केली. कार्यक्रमाचे आयोजन अनुराग फलके,रोशन डाहे, मंगेश ठाकरे,अंकिता राऊत,विवेक पोहरे,शुभम कडू यांनी केले.

## रमाई घरकुल योजनेतील ५३२ लाभार्थ्यांना मिळणार हक्काची घरे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील रमाई आवास घरकुल योजनेचे (ग्रामीण) ५३२ लाभार्थ्यांना मंजूरी मिळाली आहे. यामध्ये १४९ त्रुटी असलेल्या घरकुलांच्या प्रस्तावाला रद्द ऐवजी मंजूरीदेण्यात आली असूनया सर्व लाभार्थ्यांना हक्काची घरे मिळणार आहे. रमाई घरकुल योजना (ग्रामीण) या योजनेअंतर्गत रमाई घरकुल निर्माण समितीची बैठक राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सदर निर्णय घेण्यात आला.सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत शासनाने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजना सुरू केली आहे. या अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील लोकांचे राहणीमान उंचावणे, त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्यात येते. रमाई आवास योजनेचा लाभ संबंधित लाभार्थ्यांना मिळण्यासाठी सर्व तालुक्यातील पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी यांच्याकडून पात्र लाभार्थ्यांची यादी मंजुरीकरीता मागविण्यात आली होती.

**अशी आहे नव्याने पात्र झालेल्या लाभार्थ्यांची तालुकानिहाय संख्या**

**गोंडपिपरी तालुक्यामध्ये रद्द ऐवजी पात्र लाभार्थी संख्या ०१, सावली तालुक्यात ४१, भद्रावती तालुक्यात १०, चंद्रपूर तालुक्यात ०२ लाभार्थी तर राजुरा तालुक्यात ९५ लाभार्थी असे एकूण १४९ रद्द ऐवजी पात्र घरकुल लाभार्थ्यांची संख्या आहे.**

# मकर संक्रांत आणि पतंगबाजी

संक्रांत येणे म्हणजे संकट येणे असा वाक्यप्रचार दृढ आहे. परंतु सूर्याचं धनू राशीतून मकर राशीत संक्रमण होतं यासाठी हा सण साजरा होतो. पण या म्हणीमुळे संक्रांत येणे याला वेगळा अर्थ प्राप्त झाला. कृषीजन्य संस्कृतीतील मांडणीप्रमाणे संक्रांत म्हणजे भोगी. धनधान्य अर्पण करणे या गोष्टीचा समावेश आहे. आपल्याकडे पौष महिना शुभ कार्याला वाईट असतो अशी चुकीची समजूत काही लोकांची झालेली असते. पौष महिना शुभ कार्याला वाईट नसतो. पौष महिन्यात मकर संक्रांती येत असल्यामुळे हा गैरसमज निर्माण झालेला असावा. पौष अशुभ नसून शुभ आहे. पंचांगात पौष महिन्यातही विवाह मुहूर्त दिलेले असतात. मकरसंक्रातीपासून दिवस मोठा व रात्र लहान होऊ लागते. दिवस मोठा होणे वाईट नसून चांगली आणि आनंदाची गोष्ट आहे. प्राचीन काळी विद्युत दिवे नव्हते. त्यावेळी दिनमान मोठे होत गेल्याने अधिक वेळ कामे करता येत म्हणून मकर संक्रांत हा गोड सण मानला जातो.संत साहित्याने संक्रांत हे संक्रमण मानल आहे. वाईट गुण सोडून चांगल्याकडे जाणं सदगुणांमध्ये संक्रमण करणे म्हणजे संक्रांत. संत तुकारामांनीही आपल्या ओवीत याविषयी स्पष्ट सांगितलेल आहे. 'देव तिळी आला, गोड गोड जीव झाला' अशी ओवी त्यांनी केली होती. संक्रातीच्या दिवशी देव तिळी येणं म्हणजे नशिबी किंवा आयुष्यात येणं होय यालाच खऱ्या अर्थाने तिळगुळ किंवा संक्रांत असं संत तुकारामांनी मांडलेल आहे.हिंदू सण उत्सवाची रचना अतिशय प्राचीन काळी करण्यात आली आहे. त्याकाळी आजच्यासारखी भौतिक साधने उपलब्ध नव्हती. शेतीप्रधान संस्कृती तसेच लोकसंख्याही कमी होती. प्रवास दळणवळणाची साधनेही आतासारखी नव्हती. त्याकाळी शरीराचे, मनाचे आरोग्य चांगले ठेवणं हाच उद्देश सण उत्सव साजरे करण्यामागे होता. ऋतूप्रमाणे आहारात बदल केला तर शरीरात चांगल आरोग्य राहील. शेतीच्या कामांच्या वेळ पत्रकानुसार तसेच ऋतूवर आधारित  घरीच असतं. त्यामुळे सर्व गोष्टीचा विचार करता चांगली गोष्ट झाली त्याअर्थी संक्रांत आली असा शब्दप्रयोग होत असावा.पूर्वीचे संकट येणं हा अर्थ रद्द करून संक्रांत येणं याची नवीन व्याख्या व्हायला हवी.






जानेवारी महिना सुरू झाला आहे. येत्या १५ जानेवारीला मकर संक्रांत साजरी होणार आहे. मकर संक्रांत म्हटलं की तिळगुळ आणि तिळाचे लाडू जणू हे एकजीव समीकरण झाले आहे. कुठल्याही लहान पोरांना जरी विचारले तरीही संक्रांतीचे नाव घेताच  तिळगुळ आणि तिळाचे लाडू हा संदर्भपाठोपाठ येतोच. पण यासोबतच आणखी एक परंपरा संक्रांतीच्या सणाच्या निमित्ताने आहे आणि ती म्हणजे संक्रांत.  संक्रांतीला पतंग उडविणे अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत अनेकजण या दिवशी आकाशात पतंग उडविण्याचा आनंद घेतात. छोटे बच्चे कंपनी तर आताच या कामाला लागलेली आहे. घरातील वडीलधाऱ्यांकडून रंगीबेरंगी पतंग आणि ती उडविण्यासाठी लागणारा धागा अगदी आग्रहाने हट्टाने मागून घेत आहे. हिंदू धर्मामध्ये सण उत्सवाला विशेष महत्त्व आहे. असे म्हणता येईल की अनेकजणांकडून  प्रत्येक महिन्यात कोणता ना कोणता सण उत्सव साजरा केला जातो. जानेवारी महिना हा इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे येणारा पहिला महिना. आणि संक्रांत हा या महिन्यातील पहिला सण. असे ऐकण्यात आहे की यावर्षी संक्रांत ही १५ जानेवारीला साजरी होणार आहे. या दिवशी तिळगुळाच्या गोडव्याबरोबर  उडणाऱ्या रंगीबेरंगी पतंगांनी आकाश भरून जाणार आहे. अनेक ठिकाणी पतंग उत्सव देखील मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. परंतु या निमित्ताने अनेकांना पडला असेल की, संक्रांतीला पतंग का उडविला जातो. मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडविण्यामागे धार्मिक महत्त्व आहे. एक पौराणिक कथेतील आख्यायिका जर प्रमाण मानली तर असे सांगितले जाते की, मकर संक्रांतीला पतंग उडविण्याची परंपरा प्रभू रामचंद्रांशी संबंधित आहे. प्रभू रामाने मकर संक्रांतीच्या दिवशी आकाशात पतंग उडविण्याची परंपरा सुरू केली असे काही आख्यायिकाकार सांगतात. धार्मिकदृष्ट्या सुरू झालेली ही परंपरा असली तरी आज पतंग उडवण्यासाठी आंतरराष्ट्रीय महत्त्व निर्माण झाले आहे. ही स्पर्धा अनेक ठिकाणी बघायला मिळत आहे. या स्पर्धांमध्ये पतंग उडविणारे हौसे,नवसे,गवसे सहभागी होतात आणि पतंग उडविण्याचा आनंद  लुटतात. त्यामुळे संक्रांत आणि पतंगबाजी हे समीकरण जुळले आहे. या पतंगबाजीवरती अनेक चित्रपट गीते ऐकायला मिळतात. या पतंगावरती अनेक किस्से आपण वारंवार ऐकतो. कथा कहाण्या कानावर पडतात. यावरून पतंगाची आपल्या समाज मनात  किती खोल महत्त्व पटले आहे याची प्रचिती येते. पतंग उडविने हे माणसाच्या मनातील उत्तुंग भरारीचे आणि मनमुक्त होण्याच्या कल्पनेचे प्रतिनिधित्व करणारे प्रतीक आहे. आकाशात उडणाऱ्या विविध रंगाच्या रंगीबेरंगी पतंगा ही भारतातील विविधतेचे आणि एकतेचे प्रतीक मानले जाते. जुन्या काळामध्ये सकाळच्या वेळी आंघोळ करून पतंग उडविण्याची पद्धत होती. जेणेकरून त्वचेशी कोवळ्या सूर्यकिरणांचा संपर्क यावा. सूर्याची कोवळीकिरण म्हणजे ड जीवनसत्वाचा स्त्रोत. हिवाळा सुरू असल्यामुळे पतंग उडवताना सण साजरा करत आरोग्य राखले जावे त्यामागे ही पद्धत असावी. हिवाळ्याच्या गारव्यात त्वचेला इन्फेक्शन होतात. हे विषाणू सूर्याच्या संपर्कात आल्यानंतर त्याच्या उष्णतेमुळे जास्त काळ जगू शकत नाही. मकर संक्रांतीला  पतंग उडविण्यामागे कदाचित हे कारण असावे. फिट राहावे तंदुरुस्त राहावे असाही हेतू असावा.भारतात सांस्कृतिक विविधता अनन्यसाधारण आहे. प्रत्येक ठिकाणी स्थानिक निकषांनुसार तिथल्या भौगोलिक परिस्थितीनुसार सण साजरे केले जातात., मकर संक्रांत या एकाच दिवशी भारतभर साजरा होणाऱ्या सणाची प्रत्येक ठिकाणी वेगवेगळी नावे आहेत.

मकर संक्रांत या सणाशी निगडीत अनेक कथा ऐकायला मिळतात. या दिवशी दान करणे, नदीस्नान करणे आणि खिचडी खाण्याचे एक वेगळे महत्त्व आहे. हा सण भारतभर वेगवेगळ्या नावांनी ओळखला जातो. तामिळनाडूमध्ये या सणाला पोंगल असे म्हणतात. केरळमध्ये या सणाला विलक्कू म्हणतात. कर्नाटकात इलू बिरोधू म्हणतात. पंजाबमध्ये मकर संक्रांतीला माघी म्हणतात. गुजरात मध्ये उत्तरायण म्हणतात.मकर संक्रांतीचा सण दरवर्षी १४ जानेवारीला का येतो. (अपवाद १५ तारखेला)मकर संक्रांत म्हणजे सूर्याचा मकर राशीत प्रवेश. सूर्य ज्या दिवशी मकर राशीत प्रवेश करतो तो दिवस सूर्य दिनदर्शिका सोलर कॅलेंडरनुसार म्हणजे इंग्रजी दिनदर्शिका प्रत्येक वर्षी एकच असतो. दर आठ वर्षांनी एकदा सूर्याचा मकर राशीत प्रवेश करण्याचा दिवस एक दिवसाने पुढे ढकलला जातो म्हणजे काही वर्षी संक्रांत पंधरा तारखेला येते.

## एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ मुंबई, चे बल्लारपुर आवारात राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी




**चंद्रपूर**–दि. १२ जानेवार ला एस. एन. डी. टी महिला विद्यापीठ महर्षि कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल बल्लारपुर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे १६१ वी स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. स्वामी विवेकानंद यांची जयंती देशभरात 'युवा दिन' म्हणून साजरी केली जाते. चाळीस वर्षांचेही आयुष्य न जगताही या महापुरुषाने, कणाहीन अवस्थेत निराशेच्या गर्तेत दिशाहीन जीवन जगणाऱ्या भारतीय समाजाला तर पुनर्जागृत करून आत्मविश्वास तर दिला. तसेच जगभरातील पंडित व विचारवंतांना भारतीय संस्कृतीतील तत्त्वदर्शनाने कृतार्थ जीवनाची दिशा दाखवली.स्वामी विवेकानंद हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होतं. धर्म, इतिहास ,कला, समज, विज्ञान, साहित्य सगळ्याच क्षेत्राची त्यांचा जाण होती. शिक्षणासोबतच शास्त्रीय संगिताबाबतही त्यांना माहिती होती. एक उत्तम खेळाडू म्हणूनही स्वामी विवेकानंद यांच्याकडे पाहिलं जातं.या प्रसंगी एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ बल्लारपुर आवाराचेसंचालक डॉ. राजेश इंगोले व सहाय्यक कुलसचिव डॉ. बाळू राठोड यांच्या मार्गदर्शनात समन्वयक वेदानंद अलमस्त यांनी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून वंदन केले तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी प्रा. खुशबु जोसेफ व सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रृतिका राऊत यांनी सहभाग घेतला या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या तसेच प्रा. नेहा गिरडकर, प्रा. शितल बिल्लोरे प्रा. अश्विनी वाणी शिक्षकेतर कर्मचारी आशिष नुगुरवार,वैशाली बोमकंटीवार, ममता भेंडे, स्नेहा लोहे, मनोज अरगेलवार यांनी प्रतिमेला वंदन केले.

## 'आयुष्मान भारत'चा शेवटच्या घटका पर्यंत लाभ देवू–डॉ.ओमप्रकाश शेटे

**परभणी । प्रतिनिधी**



आयुष्मान भारत योजनेत काहीशा त्रुटी आहेत, त्या दूर व्हाव्यात या दृष्टीकोनातून  निश्चितच कारवाई केली जाईल व या योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत मिळावा या दृष्टीने ठोस प्रयत्न होतील, अशी ग्वाही आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात गुरूवारी (दि.११) डॉ. शेटे यांच्या अध्यक्षतेखाली आयुष्मान भारत/ महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने बाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली. त्या पाठोपाठ डॉ. शेटे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राहुल गिते, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. नागेश लखमावार यांची उपस्थिती होती.महात्मा फुले जन आरोग्य व केंद्र सरकारची आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य या दोन्ही योजना एकत्रितरित्या राज्यात कार्यान्वित करण्यात आल्या आहेत, असे स्पष्ट करतेवेळी डॉ. शेटे यांनी या दोन्ही योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत गरजवंतांना मिळाला पाहिजे, या दृष्टीने सर्वार्थाने प्रयत्न होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. आयुष्यमान भारत अंतर्गत देण्यात येणारे ओळखपत्र अधिकाधिक लोकांना मिळावे, यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करावेत, अशा स्पष्ट सूचना आपण प्रशासनाच्या अधिकार्यांना बजावल्या आहेत, असे ते म्हणाले.या जिल्ह्यात ७ खाजगी व ६ सरकारी दवाखाने आयुष्मान भारत योजनेच्या यादीवर आहेत. रूग्णालयांची संख्या वाढविण्याच्या सूचनाही आपण जिल्हा प्रशासनास दिल्या आहेत, असे नमूद करतेवेळी डॉ. शेटे यांनी ८० ते ९० टक्के गरजू व्यक्ती असून या सामान्य व्यक्तींना एटीएम सारखे आयुष्मान कार्ड वापरता आले पाहिजे, हे या मिशनचे प्रमुख उद्दिष्ट आहे, असे नमूद करतेवेळी डॉ. शेटे यांनी लवकरच रूग्णांच्या अडचणी दूर करण्यासाठी टोल फ्री नंबर व जिल्हा सनियंत्रण समितीचे क्रमांक जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

## सनी बासनवार यांची भाजयुमो विधानसभा संयोजक पदी नियुक्ती



**वर्धा :–** भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली यात हिंगणघाट विधानसभा प्रमुख म्हणून सनी ओमप्रकाश बासनवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.बासनवार हे भाजयुमोचे धडाडिचे कार्यकर्ते आहे. विविध सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे, आपल्या कार्यकुशलतेमुळे व संघटन कौशल्याने हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात भाजयुमो विधानसभा प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.त्यांनी आपल्या नियुक्ती बद्दल भाजयुमो प्रदेश अध्यक्ष राहुल लोणीकर आमदार समीर कुणावार व भाजयुमो जिल्हाध्यक्ष वरून पाठक यांचे आभार मानले.त्यांचा नियुक्ती बाबत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष नितीन मडावी, जिल्हा महामंत्री गौरव तांबोळी,अमोल त्रिपाठी, योगेश जिकार भुषण आष्टनकर,गौरव खिराळे , दादु चाफले,मोहन तुमराम क आशिष उंडे केतन भुडे,सचिन पोटदुखे व इतर कार्यकर्ते तसेच मित्रमंडळीनी आदींनी अभिनंदन केले.

## शिवसेनेच्या मशाल चिन्हावर पुन्हा समता पक्षाचा दावा

# समता पक्ष आता मशाल चिन्हासाठी आयोगाकडे अर्ज करणार;'मशाल'ही जाणार?

**मुंबई**–ठाकरे गटाच्या सध्याच्या मशाल चिन्हावर समता पक्षाने दावा केला आहे.शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्ह हे दोन्ही शिंदे गटाला मिळाल्यानंतर आता शिवसेनेच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला मिळालेल्या मशाल चिन्हावर देखील समता पक्षाने दावा सांगितला आहे. त्यामुळे 'धनुष्यबाण' या चिन्हापाठोपाठच आता मशाल हे चिन्ह देखील ठाकरेंच्या हातून जाण्याची शक्यता आहे.दरम्यान समता पक्षाने मशाल चिन्हावर दावा केला आहे. निवडणूक आयोगाच्या नव्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे मशाल चिन्हासाठी अर्ज करण्याचा अधिकार असल्याचे समता पक्षाने म्हटले आहे. शिवसेना पक्ष शिंदेंकडे गेल्यानंतर निवडणूक आयोगाने ठाकरे गटाला मशाल हे चिन्हं दिले होते. मात्र आता मशाल चिन्हही ठाकरेंच्या हातातून जाणार की काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे.निवडणूक आयोगाकडे अर्ज ४ जानेवारी २०२४ रोजी निवडणूक आयोगाने नोंदणीकृत पण मान्यता नसलेल्या पक्षांना चिन्ह देण्याबाबत प्रक्रिया सुरू केली आहे. आजपासून (११ जानेवारी २०२४) ज्या पक्षांना कॉमन पक्ष चिन्ह हवे असेल त्यांना दिले जाईल, असे निवडणूक आयोगाने सांगितले आहे. त्यामुळे समता पक्ष आता चिन्हासाठी आयोगाकडे अर्ज करणार आहे. तसेच




चिन्हासाठीच्या सर्व अटी पूर्ण केल्या असल्याचाही दावा समता पक्षाने केला आहे.मशाल या चिन्हावर दिवगंत जॉर्ज फर्नांडिस यांच्या समता पार्टीने दावा केला आहे. १९९६ पासून हे चिन्ह आपल्याकडे असल्याचे सांगत समता पार्टीने निवडणूक आयोगाकडे धाव घेतली. तर २००४ मध्ये समता पक्षाची राज्य पक्ष म्हणून मान्यता काढून घेत असल्याचे सांगत निवडणूक आयोगाने ठाकरे गटाला मशाल हे चिन्ह बहाल केले अशी प्रतिक्रिया समता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तृणेश देवळेकर यांनी दिली आहे. याप्रकरणी आपण निवडणूक आयोगाला इमेल पाठवून चिन्हावर हक्क सांगितला असल्याचे त्यांनी सांगितले.

## शालिनी पाटील यांचा गंभीर आरोप

# अजित पवारांना घोटाळ्यातून वाचविण्याचे काम फडणवीस अन् पंतप्रधान मोदी करतायत

**मुंबई**–उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शिखर बँक घोटाळ्यातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाचवले, तर जलसिंचन घोटाळ्यातून पंतप्रधान नरेंद्र मोदी वाचवत आहेत. नरेंद्र मोदी यांनी त्यांना भाजपसोबत घेऊन संरक्षण दिल्याचा आरोप शालिनी पाटील यांनी केला आहे.दरम्यान, शालिनी पाटील यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना एक पत्र लिहले आहेत. ज्यात, पूर्वीच्या जनसंघाने शिखर बँकेत २५ हजार कोटी रूपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या अजित पवार यांना सोबत घेऊन संरक्षण दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.शालिनी पाटील म्हणाल्या की, भारतीय जनता पक्षाचे मूळ नाव जनसंघ आहे. मग त्यांना भारतीय जनता पक्ष म्हणजेच भारतीय हे नाव वापरायचा अधिकार कोणी दिला. महाराष्ट्रातील काही नेते माझे ऐकतात, त्यांना मी पत्र लिहून भारतीय जनता पक्ष आणि अजित पवार यांच्याबाबत लढण्यासाठी विनंती केली आहे.शालिनी पाटील म्हणाल्या की, अजित पवार हे नाव पुढच्या काही दिवसात महाराष्ट्राच्या नकाशावरून गायब होईल. शरद पवारांच्या वयावरून बोलण्याचा त्यांना अधिकार कोणी दिला. अजित पवारांना हे प्रश्न विचारण्याचा अधिकार काय आहे. शरद पवार ठरवतील त्यांना कधी रिटायर व्हायचा आहे. उद्या मला देखील



मी ९२ वर्षाची असल्याने वेडे ठरवतील, असा हल्लाबोल पाटील यांनी केला आहे.शालिनी पाटील म्हणाल्या की, अजित पवार यांनी माझ्याकडे पैसा कुठून येतो याची चौकशी लावली. अँटी करप्शनचे अधिकारी याची चौकशी करत होते. त्यांना सांगायचे आहे, मला महिन्याला चार पेन्शन्स मिळतात. यातूनच मी कोर्टातील लढाई लढण्यासाठी खर्च करत असते. मागील पंधरा वर्षात तब्बल दोन कोटी रुपयांचा खर्च केला आहे. मी माझा कारखाना सभासदांच्या हातात दिल्याशिवाय गप्प बसणार नाही.

# राज्य सरकारचे टपाल तिकिटांमधून राष्ट्रपुरुषांना अभिवादन

## वने व सांस्कृतिक कार्य मंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिपादन

**सिंदखेडराजा । प्रतिनिधी**

'डाक विभागाच्या इतिहासात आजपर्यंत कधीही शक्य झाले नाही ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऊर्जेमुळे शक्य झाले. ३५०व्या राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने महाराजांवरील टपाल तिकीट अवघ्या सहा दिवसांत प्रकाशित करण्याचा विक्रम झाला. त्यानंतर राज्याच्या सांस्कृतिक विभागाने शहाजी राजांवर, १२ जानेवारी रोज शुक्रवारला राजमाता जिजाऊंवर टपाल तिकीट काढले. आता पुढील महिन्यात छत्रपती संभाजी महाराजांवरील टपाल तिकीट प्रकाशित होणार आहे. राज्य सरकार टपाल तिकिटांच्या माध्यमातून राष्ट्रपुरुषांना अभिवादन करीत आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्यव्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आज (शुक्रवार) केले.

सिंदखेडराजा येथील मातृतीर्थावर राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त राजमाता जिआऊ यांच्यावरील टपाल तिकिटाचे ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते विमोचन झाले. यावेळी राज्याचे सहकार मंत्री तसेच



बुलढाण्याचे पालकमंत्री ना. दिलीप वळसे पाटील, सिंदखेडराजाचे आमदार डॉ. राजेंद्र शिंगणे, जळगाव जामोदचे आमदार डॉ. संजय कुटे, खामगावचे आमदार ॲड. आकाश फुंडकर, चिखलीच्या आमदार श्वेताताई महाले, माजी आमदार चैनसुख संचेती, बुलढाण्याचे जिल्हाधिकारी किरण पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश भांटे, माजी आमदार विजयराज शिंदे, संभाजीनगरचे पोस्ट मास्टर जनरल अदनान अहमद, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नाझीर काझी, भाजप जिल्हाध्यक्ष सचिन देशमुख, सिंदखेडराजाचे नगराध्यक्ष सतीश तायडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. ना. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 'राजमाता जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांवर धर्मसंस्कार केले, त्यांना युद्धनिती शिकवली. या संस्कारामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार जगाला रयतेची सेवा करण्याचा संकल्प देणारा ठरला. जगाला जाणता राजा देणाऱ्या सिंदखेडला आणि मातृतीर्थाला माझे कोटी कोटी नमन.' सिंदखेडराजाचा विकास आराखडा लवकरात लवकर मंजूर होऊन गुणवत्तापूर्ण विकासकामे होण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५०व्या राज्याभिषेक दिन सोहळ्याच्या निमित्ताने राज्य सरकारने अनेक उपक्रम राबविले आणि अनेक निर्णय देखील केले. ज्या क्रूर अफजलखानाचा महाराजांनी वध केला, त्याची कबर बांधून केलेले अतिक्रमण सरकारने तोडले. आता त्याच ठिकाणी शिवाजी महाराज वाघनखांनी अफजलखानाचा वध करतानाचे शिल्प उभारण्याचा निर्धार आम्ही केला आहे. महाराजांनी ज्या वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला, ती वाघनखे देखील ब्रिटनवरून भारतात येणार आहेत. आम्ही पुणेकर आणि राज्य सरकारच्या वतीने भारत-पाकिस्तान सीमेवर पाकिस्तानच्या दिशेने तलवार घेऊन असलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण झाले. या सोहळ्याला दीड हजारांहून अधिक भारतीय जवान उपस्थित होते,' असेही ना.मुनगंटीवार म्हणाले.

## वाघिरा ग्रामपंचायत मध्ये राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंदांची जयंती साजरी



**पाटोदा । प्रतिनिधी**

राजमाता जिजाऊंच्या व स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त१२ जानेवारी रोज शुक्रवारला पाटोदा तालुक्यातील वाघिरा नगरीत ग्रामस्थांसह ग्रामपंचायत व शाळे मध्ये जयंती साजरी करण्यात आली.राजमातेला मानाचा मुजरा करण्यासाठी आलेल्या जिजाऊ प्रेमींच्या हस्ते गावातील जिल्हा परिषद शाळा येथे जयंती साजरी करून सर्व विध्यार्थ्यांना पेन वाटप केले व माँ साहेबांची उत्कृष्ट वेशभूषा करणाऱ्यांना बक्षीस प्रदान करण्यात आले. सह्याद्रीच्या कुशीत घोंगवणार वादळ आणि जवळपास ३५० वर्षांहून अधिक काळ अधिराज्य करणाऱ्या वाघाला जन्म देणाऱ्या स्वराज्याच्या आद्यजननी ज्यांच्या विचारांची पुन्हा विचारधारा तयार होऊन पूर्ण शिवचरित्र तयार झाले अशा क्रांतीज्योती, स्वराज्यजननी मा.जिजाऊसाहेब यांच्या कार्याची ओळख शाळेतील मुलांना या जयंती उत्सवामुळे झाली व हिंदू धर्माचे प्रचारक आणि प्रसारक,युवाशक्तीची प्रेरणा,शिकागो च्या धर्मपरिषदेत हिंदू धर्माची भगवी पताका डौलाने फडकवणारे,हिंदुस्थानचे युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी वाघिरा ग्रामपंचायतचे सदस्य, उपसरपंच व गावातील सुज्ञ नागरिकांसह शाळेचे शिक्षक उपस्थित होते.

## गोंडवाना विद्यापीठात 'विसडम ऑफ माईंड' कार्यशाळेचा समारोप

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे विसडम ऑफ माईंड या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ११ जानेवारीला त्याचा दुसरा दिवस होता. या कार्यशाळेमध्ये डावा मेंदू, उजवा मेंदू, मेंदूची क्रियाशीलता वाढविणे, मानसिक आरोग्याच्या सुदृढतेसाठी काम करण्याचे उपाय सांगण्यात आले.

या कार्यशाळेचा लाभ विद्यापीठाचे प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी घेतला. विविध प्रकारच्या उपक्रमांदारद्वारे डॉ. जितेंदर कुमार ,हिसार, हरियाणा यांनी मन, मस्तिष्क या संकल्पना स्पष्ट करत वैश्विक मनाची संकल्पना विषद केली. अनेकांनी त्यांच्या मनात उत्पन्न झालेले प्रश्न त्यांना विचारले व अत्यंत समाधान करणारे उत्तर प्रत्येकाला मिळाले. मेंदूला अधिक कार्यप्रवण करण्यासाठी त्यांनी अगदी छोटे छोटे व्यायाम सांगितले. ज्याचा प्रत्यक्षामध्ये उपयोग करण्यास कालपासूनच विद्यार्थ्यांनी सुरुवात केली. मेंदूच्या क्रियाकलापाविषयी आश्चर्यकारक चित्रफिती त्यांनी प्रशिक्षणार्थ्यांना दाखवल्या. त्यामुळे प्रशिक्षणार्थी फार प्रभावित झाले व या विषयाकडे विशेषत्वाने आकर्षित झाले. नंतर कार्यशाळेचा समारोप कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये वाणिज्य विभागाचे स.प्रा. डॉ. अनिरुद्ध गचके, डॉ. शिल्पा आठवले, प्रशिक्षक डॉ. जितेंदर कुमार मंचावरती उपस्थित होते. विराग गायकवाड व राजेश्वरी कोटा या विद्यार्थ्यांनी तसेच स. प्रा. डॉ.मनीष देशपांडे, डॉ.



शिल्पा आठवले, डॉ.अनिरुद्ध गचके यांनी कार्यशाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले व आयोजकांचे आणि विद्यापीठाचे मनापासून आभार मानले की इतक्या महत्त्वपूर्ण आणि जीवन सुंदर करणाऱ्या विषयाची कार्यशाळा मराठी विभागाने पुढाकार घेऊन आयोजित केली. या कार्यशाळेसाठी प्रत्येक प्रशिक्षणार्थीने प्रत्यक्ष भेटून डॉ. जितेंदर कुमार आणि कार्यशाळेच्या समन्वयक मराठी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सविता गोविंदवार यांचे मनापासून आभार मानले. समारोपीय कार्यक्रमाचे संचालन स. प्रा. डॉ. हेमराज निखाडे यांनी तर आभार डॉ. सविता गोविंदवार यांनी व्यक्त केले. हा कार्यक्रम मराठी विभागाने पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील सर्व विभागाच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला होता. या विषयावर कर्मचारी विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यासाठी विद्यापीठामध्ये सखोल संशोधनात्मक कार्य लवकरच सुरू होत आहे. कार्यक्रमासाठी मराठी विभागाचे स.प्रा. डॉ. निळकंठ नरवाडे, डॉ.हेमराज निखाडे ,प्रा. अमोल चव्हाण जनसंवाद विभागाचे स. प्रा. डॉ. मोहम्मद सरफराज अन्सारी, डॉ. संजय डाफ, डॉ. रोहित कांबळे, डॉ.चैतन्य शिनखेडे, संगणक शास्त्र विषयाचे स. प्रा. डॉ.मनीष देशपांडे व इतर सर्व प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

## तुळजापूर येथे सर्व संत स्मृती मानवता दिन साजरा

## राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न

**वर्धा । प्रतिनिधी**

तुळजापूर वघाळा येथील प्रभाग क्र. दोन मध्ये हनुमान मंदिरात दि. ८ व ९ जानेवारी रोजी सर्व संत स्मृती मानवता दिनाचे औचित्य साधून वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या पुतळ्याचे प्राणप्रतिष्ठा सोहळा कार्यक्रम संपन्न झाला.या प्रसंगी सायंकाळी पालखीतून महाराजांच्या पुतळ्याची मिरवणूक काढण्यात येवून विधीवत स्थापना करण्यात आली.श्री गुरूदेव की जय जय भवानी जय शिवाजी जय श्री राम. जय हनुमान च्या जयघोषाने तुळजापूर नगरी दूमदूमली होती. नंतर रात्री स्थानिक श्री गुरूदेव सेवा मंडळ लक्ष्मी माता भजन मंडळ तुळजापूर.श्री गुरूदेव बाल गुरूदेव भजन मंडळ वघाळा. सोनेगाव. खरांगणा( गोडे) सुरळीत ( स्टेशन) करंजी ( भोगे) यादी भजन मंडळाचा खंजिरी भजनाचा कार्यक्रम पार पडला. दि. ९ ला सकाळी परिसर स्वच्छता. नंतर गोपालकाला या वेळी वर्धा येथील प्रमुख पाहुणे म्हणून भजन सम्राट दत्ता राऊत ( खंजिरी) भजन या प्रसंगी जेष्ठ प्रचारक कृष्णाजी पाहूणे (तबला) बोरगाव (मेघे) यांच्या सोबत श्री गुरूदेव सेवा मंडळाने



साथसंगत दिली. प्रमुख पाहुणे मंडळी नी गुरूदेव सेवकांना ग्रामगीता आधारित मोलाचे मार्गदर्शन केले. शेवटी महाप्रसाद नंतर रात्री भजन करून कलेश विसर्जन करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक श्री गुरूदेव सेवा मंडळाचे नामदेव येडे. वाल्मिक मोहदूरे. आकाश येडे. सुभाष पवार. नारायण सराम.महेश कोडापे. गजानन मोहदूरे. शैलेश मोहदूरे.बालू मोहदूरे तसेच गुरूदेव प्रेमी प्रामुख्याने उपस्थित होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जिल्हा प्रसिद्धी प्रमुख गजानन जिकार यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रवंदनेने झाला.

## श्री बागेश्वर धाम सेवा समितीची जिल्हा कार्यकारिणी घोषित

### जनसेवेच्या ईश्वरीय कार्यात अहोरात्र तत्पर राहू : रजत बत्रा

**वर्धा । प्रतिनिधी**

श्री बागेश्वर धाम सेवा समिती महाराष्ट्र प्रदेश अंतर्गत वर्धा जिल्हा कार्यकारिणी गठित करण्यात आली असून यामध्ये वर्धा जिल्हा संयोजक म्हणून रजत बत्रा यांची निवड करण्यात आली आहे.या बद्दल रजत बत्रा यांनी श्री बागेश्वर धाम चे महंत धीरेंद्र कृष्ण शास्त्री महाराजांचे तसेच महाराष्ट्र प्रदेश संयोजक अभिजीत करंजुले पाटील, प्रदेश सह-संयोजक रंजन ढोमने, प्रदेश कार्यालयाचे श्रीकांत रेड्डी यांची मनस्वी आभार मानले.

वर्धत आर्वी नाका परिसरात जिल्हा संपर्क कार्यालयाचे पोस्टराचे विमोचन करण्यात आले, याप्रसंगी श्री बागेश्वर धाम सेवा समितीचे महाराष्ट्र प्रदेश संयोजक अभिजीत करंजुले पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकारिणी चा विस्तार करण्यात



आला.ज्यामध्ये रजत बत्रा यांच्या नेतृत्वात झालेल्या निर्वाचनानुसार वर्धा जिल्हा महामंत्री म्हणून नितीन प्रभाकर शेंडे व संकेत श्रीगोड , जिल्हा सह-संयोजक म्हणून ऋषिकेश खराते, अमित भुरे व विद्याताई शेळके यांची निवड झाली. तसेच जिल्हा सचिव म्हणून प्रशांत राऊत, कुणाल टिपले, गजानन ससाने यांची त्याचप्रमाणे सेलू तालुका संयोजक ओम टवलारे, कान्हापूर ग्राम पंचायत संयोजक म्हणून आकाश बुरले आदींची निवड झाली आहे. याप्रसंगी प्रदेश संयोजक अभिजीत करंजुले पाटिल साहेब यांनी आगामी उपक्रमांबाबत माहिती देताना श्री बागेश्वर धाम सेवा समिती सामाजिक कार्याला प्रोत्साहन देणार असून या अंतर्गत वृक्षारोपण, रक्तदान, गौसेवा, अन्नदान, हॉस्पिटल सेवा, सामूहिक कन्या विवाह, भागवत कथा, भजन कीर्तन या प्रकारच्या सामाजिक गतिविधी राबवणार असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा संयोजक रजत बत्रा यांनी भारत देशाची एकता व अखंडता याकरिता संपूर्ण जिल्ह्यात कार्य केल्या जाईल तसेच विविध सामाजिक क्षेत्रात सात्विक वृत्तीने समाजासाठी योगदान व जन सेवेच्या ईश्वरीय कार्यात सदैव तत्पर राहणार असल्याचे मनोगत व्यक्त केले.

## इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळे मध्ये इयत्ता१ली प्रवेशाकरीता अर्ज आमंत्रित

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात नामांकित शाळा निवडीच्या प्रकियेसाठी अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेमध्ये इयत्ता १ ली मध्ये प्रवेश देण्याकरीता योजना असून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर यांचे कार्यालयाकडून अर्ज मागविण्यात येत आहे. प्रवेशाकरीता ४ जानेवारीपासून प्रवेश अर्ज नि:शुल्क वितरीत करण्यात येत असून संपूर्ण भरलेले अर्ज विहित कागदपत्रासह दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत स्विकारले जातील.

**इयत्ता १ लीत प्रवेश घेण्याकरीता अटी व शर्ती:**

सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी हा अनुसूचित जमातीचा असावा. विद्यार्थ्यांनी सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षंकित प्रत सादर करावी व प्रमाणपत्राची मुळप्रत तपासणीसाठी सोबत आणावी. जर विद्यार्थ्याचे पालक दारिद्र्य रेषेखालील असेल तर सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले बी.पी.एल.प्रमाणपत्र जोडावे. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा १ लक्ष रु. इतकी असावी. शाळा प्रवेशासाठी बालकाचे किमान वय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे दिनांक २५ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयाप्रमाणे असावे.इयत्ता १ ली मध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे वय ६ वर्ष पूर्ण झालेले असावे. मुला/मुलीचे वय दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी ६ वर्ष पुर्ण झालेले असावे. अर्जासोबत विद्यार्थ्यांचा जन्म तारखेचा दाखला, वैद्यकीय प्रमाणपत्र, आधार कार्ड जोडण्यात यावे. विद्यार्थ्यांचे पालक शासकीय / निमशासकीय नोकरदार नसावेत, तसे प्रमाणित करण्यात यावे. तसे आढळल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. खोटी माहिती सादर केल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी संमतीपत्र जोडावे व विद्यार्थ्याचे पासपोर्ट आकाराचे दोन फोटो जोडावे. विद्यार्थ्यांचे पालक विधवा, निराधार, परितक्त्या असल्यास अर्जासोबत तसा पुरावा जोडावा. निवड झालेल्या विद्यार्थ्याला एकदा शाळा निश्चीत झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत पालकाच्या व पाल्यांच्या विनंतीनुसार शाळा बदलता येणार नाही. याबाबत पालकाचे हमीपत्र अर्जासोबत जोडण्यात यावे.वरीलप्रमाणे प्रवेशाबाबतचे दाखले अर्जासोबत जोडून दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत सादर करावेत. उशिरा प्राप्त झालेल्या अर्जाचा कोणताही विचार करण्यात येणार नाही. शासन निर्णयाप्रमाणे निवड प्रक्रियेचा पूर्ण अधिकार प्रकल्पस्तरीय निवड समिती यांना राहील. शासनस्तरावर निवड झालेल्या शाळेत व मंजुर प्रवेश संख्येच्या अधिन राहून विद्यार्थी निवड प्रक्रिया करण्यात येईल. मंजूर जागेपेक्षा जास्त प्रमाणात आवेदन प्राप्त झाल्यास ईश्वर चिठ्ठीद्वारे निवड प्रक्रिया केल्या जाईल.

**या ठिकाणी आहेत प्रवेश अर्ज निशुल्क उपलब्ध:**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर या कार्यालयातंर्गत आदिवासी मुला/मुलींचे शासकीय वस्तीगृह/ शासकीय/अनुदानित आश्रमशाळा/ एकलव्य शाळा देवाडा/ नामांकित निवासी शाळा या ठिकाणी प्रवेश अर्ज निशुल्क स्वरूपात उपलब्ध आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा, असे सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी मुरुगानंथम एम. यांनी कळविले आहे.

## ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात राजमाता जिजाऊ जयंती

### राजमाता जिजाऊ हिंदवी स्वराज्याच्या जननी- विवेक बोढे




**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात शुक्रवार, १२ जानेवारी रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात साजरी करण्यात आली.याप्रसंगी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे यांनी अभिवादन केले.मनोगत व्यक्त करतांना भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे म्हणाले, स्वराज्य स्थापनेचे बाळकडू छत्रपती शिवाजी महाराजांना माँसाहेबांकडून मिळाले होते.शिवबांना लहानपणापासून रामायण आणि महाभारतातील शौर्य कथा त्यांनी सांगितल्या. गरिब रयतेच्या सुखासाठी स्वतंत्र स्वराज्य बनवावे हि राजमाता जिजाऊंची इच्छा होती.यावेळी भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, माजी जि.प. सभापती नितु चौधरी, प्रयास सखी मंच अध्यक्षा किरण बोढे, माजी ग्रामपंचायत सदस्या वैशाली ढवस, सुचिता लुटे, भाजपाचे अमोल थेरे, कामगार नेते सचिन कोंडावार, किरण फुलझले, जितू कुम्मरवार, सुनंदा लिहीतकर, शीतल कामतवार, खुशबू मेश्राम व नागरिक उपस्थित होते.

# केन्द्र सरकारने हिट अँड रन कायदा तात्काळ रद्द न केल्यास येत्या काळात तिव्र आंदोलन करणार

## हिट अँड रन कायद्या विरोधात शेकडो वाहन चालकांनी केला सुभाषनगर येथे रास्तारोको

**गडचिरोली | प्रतिनिधी**

अखील महाराष्ट्र वाहन चालक संघटनेच्या वतीने केंद्र सरकारने केलेला हिट अँड रन कायदा तात्काळ रद्द करावा ही मागणी घेऊन वाहन चालक संघटनेने १२जानेवारी रोज शुक्रवारला सुभाषनगर फाट्यावर रास्ता रोको चक्काजाम आंदोलन केले.

केंद्र सरकारने नुकताच संसदेत हिट अँड रन कायदा पारित केला असुन या कायद्यामुळे अपघात स्थळावरून गाडी चालक निघून गेल्यास त्याला सरसकट दहा वर्षे कारावास आणि सात लाख रुपयाचे दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात करण्यात आली आहे.एखाद्या ठिकाणी चुकुन अपघात घडल्यास जखमीना मृत्यूच्या दारी सोडून जाणे हे अमानवीय कृत्य आहे, त्यामुळे कोणताही वाहन चालक अपघात ग्रस्ताला घटनास्थळी सोडुन जाऊ इच्छित नाही मात्र बरेच वेळा अपघातग्रस्त वाहन चालकाची चुक नसतांना देखील संतप्त नागरिक आणि जमवाकडून वाहन चालकाला बेदम मारझोड करुन त्याच्या गाडीची तोडफोड करतात व एखाद्या वेळी जमावाकडुन प्राणघातक हल्ले केल्या जातात.परीणामी निष्पाप वाहन चालकाला जिवे मारण्याचा प्रयत्नही केला जातो. त्यामुळे स्वतःच्या संरक्षण करीता काही वाहन चालक घटना स्थळावरून पळ काढतात. त्यांच्या या कृतीमुळे त्यांना अपघातास जबाबदार धरून त्यांना हिट अँड रन कायद्याखाली कठोर शिक्षेचा केन्द्र सरकारने निर्णय घेतलेला आहे.ह्या कायदाने वाहन चालवणाऱ्या प्रत्येक चालकाच्या मनात अत्यंत भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. आणि हा कायदा वाहन चालकावर अन्याय करणारा आहे. हा कायदा केन्द्र सरकारने तात्काळ रद्द करावा या करीता या पुर्वी आलापल्ली येथे वाहन चालक संघटनेच्या वतिने एक दिवशीय निषेध सभा घेऊन केन्द्र शासनाचे लक्ष वेधले गेले परंतु देशभरातील वाहन चालकाच्या आंदोलनाची केन्द्र सरकारने दख्खल घेतलेली नाही.ह्या कायदाने वाहन चालवणाऱ्या प्रत्येक चालकाच्या मनात अत्यंत भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. आणि हा कायदा वाहन चालकावर अन्याय करणारा आहे. हा कायदा केन्द्र सरकारने तात्काळ रद्द करावा या करीता या पुर्वी आलापल्ली येथे वाहन चालक संघटनेच्या वतिने एक दिवशीय निषेध सभा घेऊन केन्द्र शासनाचे लक्ष वेधले गेले परंतु देशभरातील वाहन चालकाच्या आंदोलनाची केन्द्र सरकारने दख्खल घेतलेली नाही.आणि म्हणुन देशभरातील प्रत्येक राज्यात व प्रत्येक जिल्ह्यातील शहरी




भागापासुन तर ग्रामीण भागापर्यंत वाहन चालकाकडुन स्टेरींग बंद व लोकशाहीच्या मार्गाने अनेक आंदोलन होत असताना अखील महाराष्ट्र वाहन चालक संघटना अहेरी, आलापल्लीच्या वतिने सुभाषनगर येथे सकाळी १०.०० पासुन केन्द्र सरकारच्या चुकीच्या निर्णया विरोधात शेकडो वाहन चालकाच्या वतिने रास्तारोको चक्काजाम आंदोलन करण्यात आले आणि केन्द्र सरकारने हिट अँड रन कायदा तात्काळ रद्द न केल्यास येत्या काळात तिव्र आंदोलन करणार असल्याचे वाहन चालकानी सांगीतले.या आंदोलनात काँग्रेस नेते जि.प. माजी अध्यक्ष अजय कंकडालवार भारतीय जनसंसदेचे गडचिरोली जिल्हाध्यक्ष विजय खरवडे यानी सहभाग नोंदवून पाठींबा दर्शविला आंदोलना स्थळी अतिरीक्त पोलीस अधिक्षक एम रमेश, पोलीस उपविभागीय अधिकारी सुदर्शन राठोड, अहेरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मनोज काळबांडे, एपीआय विजय चव्हान तथा बहुसंख्य पोलीस बंदोबस्त तैनात होते.या वेळी अखील महाराष्ट्र वाहन चालक संघटनेचे अध्यक्ष बाळु बांगरे तसेच आंदोलन कर्ते वाहन चालक राहुल शुक्ला, संदीप मडावी, प्रविन लिंगनवार, तुकाराम धुर्वे, नागेश मारेन, प्रशांत अलगमकार, अनिल पुलगमकार, विशाल मडावी, किशोर मंटकवार, विठ्ठल गेडाम, श्रीनिवास कनमवार, गणेश सोनकरस, पंकज साव, राहुल सिंघ, हिरालाल जाधव, आनंदभाई,पवन गोसावी, सर्वेश गोसावी, निशाद मसरामसुभाष राम, अशोक खोब्रागडे, नंदकुमार डोके, सागर हिचामी, दुशांत पेंदाम, प्रफुल रोहनकर, परवेश पठान, शरद झाडे, राजु गावडे, राहुल डोके, शंकर चांदेकर, सुनिल एकोनकार, संजय हिचाम क्रिष्णा गावडे यासह निषेध सभेला अहेरी तालुक्यातील असंख्य वाहन चालक उपस्थीत होते.

# स्पर्धेतूनच यशस्वी व्यक्ती घडत असतो मुख्य न्यायदंडाधिकारी प्रशांत कुळकर्णी

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

स्पर्धेतूनच यशस्वी व्यक्ती घडत असतो. म्हणून स्पर्धेला न घाबरता विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घ्यावा यातून विद्यार्थ्यांमधील सुप्तगुण बाहेर पडतील, असे प्रतिपादन मुख्य न्यायदंडाधिकारी प्रशांत कुळकर्णी यांनी केले. जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सवाच्या बक्षिस वितरण कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाला मनपा आयुक्त विपिन पालिवाल, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव सुमित जोशी, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अधिकारी प्रदीप काठोळे तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी दीपक बानाईत यांच्या मार्गदर्शनात जिल्हास्तरीय चाचा नेहरू बालमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील शासकीय तथा* निमशासकीय बालगृहातील मुलांचा शारीरिक




व मानसिक विकास व्हावा तसेच इतर मुलांसोबत स्पर्धा करण्याचा आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी चाचा नेहरू बालमहोत्सव सुरू करण्याची परंपरा प्रेरणादायी आहे.

**बक्षीस वितरण:**पोलिस फुटबॉल मैदान येथे रंगलेल्या तीन दिवसीय कबड्डी, खो-खो, गोळा फेक, धावणे, रिले, कॅरम, बुद्धिबळ, निबंध, वक्तृत्व, वादविवाद, नृत्य, गायन आदी जिल्हास्तरीय स्पर्धांचे बक्षीस वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये विजेते स्पर्धक नागपूर येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील चाचा नेहरू बाल महोत्सव २०२३-२४ स्पर्धेकरीता पात्र ठरले आहेत.

**उल्लेखनीय कार्याबाबत गौरव:**या सोहळ्यात जिल्हा बाल संरक्षण कक्षातील, जिल्हा बाल संरक्षण कक्ष अधिकारी अजय साखरकर, समुपदेशक प्रिया पिंपळशेंडे, समाजसेविका प्रतिभा मडावी यांना उल्लेखनिय कार्याबाबत मुख्य न्यायदंडाधिकारी प्रशांत कुळकर्णीयांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# अजय कंकडालवार यांनी शेंडे परिवाराला केली आर्थिक मदत

**अहेरी | प्रतिनिधी**

तालुक्यातील नवेगाव येथील रहिवासी नितेश बाबुराव शेंडे यांची काही दिवसा पासून प्रकृती अत्यंत खूप खराब असल्यामुळे त्यांना दवाखान्यात घेऊन जाण्यासाठी त्या परिवाराची आर्थिक स्थिती नसल्याने शेंडे परिवाराला अडचण भासत होती.याचीच माहिती नवेगाव येथील स्मिथ शेंडे,विकास शेंडे,प्रमोद शेंडे, अश्विन कोटरंगे,कुमार गुरनुले या युवकांनी आविसं काँग्रेसचे नेते व माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय यांच्या अहेरी येथील जनसंपर्क कार्यालयात भेट घेऊन त्या परिवाराची अडचण सांगितली .यांचे म्हणणे ऐकून, त्यांची अडचण पाहून वेळेचा विलंब न करता नितेश शेंडे यांना औषध उपचारासाठी आर्थिक मदत केली आहे.यावेळी माजी जि.प.सदस्य अजय नैताम,माजी पंचायत समिती सभापती



भास्कर तलांडे,अहेरी नगरपंचायतचे नगरसेवक प्रशांत गोडसेलवार,माजी जि.प.सदस्य सुनीता कूसनाके,माजी सभापती सुरेखा आलम,मारपाल्ली ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच कार्तिक तोगम,राकेश सडमेक,प्रकाश दुर्गे,लक्ष्मण आत्रामसह आविसं - काँग्रेसचे कार्यकर्ते तसेच शेंडे परिवाराचे नातेवाईक उपस्थित होते.

# गडचिरोली नगरीत खासदार अशोक नेते यांच्या नेतृत्वात श्रीराम जन्मभूमी अयोध्या मंदिर प्राण प्रतिष्ठा अक्षदा वाटप



**गडचिरोली | प्रतिनिधी**

येत्या २२ जानेवारी ला भगवान श्रीराम जन्मभूमी मंदिर अयोध्याला मुर्ती प्राण प्रतिष्ठा करण्यासाठी भगवान श्रीरामाचे पूजन व्हावे, भजन, व कीर्तन व्हावे आणि २२ जानेवारी २०२४ ला प्रत्येकांच्या घराघरांमध्ये रांगोळी,दिवे लावून दिवाळी या सणासारखा जल्लोउत्सव साजरा करावा. अयोध्येला दर्शनांसाठी जाण्याकरिता अयोध्या वरून आलेल्या अक्षदाचे पुजन करून देवघरांसमोर किंवा मंदिरामध्ये अर्पण करावे.यासाठी प्रत्येक घरोघरी अक्षदा वाटपाचा कार्यक्रम संपूर्ण भारतभर, विश्वभर सुरू आहे. हे अभियान ०१ जानेवारी ते १४ जानेवारी पर्यंत असल्यामुळे गडचिरोली शहरातील परिसरात गडचिरोली चिमुर लोकसभा क्षेत्राचे खासदार तथा राष्ट्रीय महामंत्री भाजपा अनू. जनजाती मोर्चा चे अशोक नेते यांच्या नेतृत्वात तसेच सोबत जिल्हा संघ चालक घिशुलालजी काबरा, जिल्हा महामंत्री प्रकाश गेडाम, जिल्हा उपाध्यक्ष भारत खटी, माजी न.प.उपाध्यक्ष अनिल कुनघाडकर, दिलीप खडसे, शहराध्यक्ष धानोरा सारंग साळवे , इत्यादींनी गडचिरोली शहरातील जुनी वस्ती, त्रिमूर्ती चौक, आणि दुर्गा मंदिर, व्यापारी लाईन, जवळच्या परिसरात घराघरांत फिरून अक्षदा वाटपाचा कार्यक्रम केला. हे अभियान पूर्ण करण्यासाठी नागरिकांनी ही या अभियानात सहभागी होऊन अक्षदा वाटप करावे. असे आवाहन ही याप्रसंगी खासदार अशोक नेते यांनी केले.

# समाजाच्या कल्याणासाठी पत्रकारिता करा-जेष्ठ संपादक शैलेश पांडे

**गडचिरोली | प्रतिनिधी**

पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ जिवंत ठेवला तर लोकतंत्र बळकट होईल, ज्या देशातील माध्यमे मजबूत असतात त्या देशात लोकशाही मजबूत असते. समाजाच्या कल्याणासाठी पत्रकारिता करा, हीच खरी बाळशास्त्री जांभेकर यांना आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन तरुण भारता वृत्तपत्राच्या डिजिटल आवृत्तीचे जेष्ठ संपादक आणि साहित्यिक, लेखक शैलेश पांडे यांनी केले. गोंडवाना विद्यापीठात जनसंवाद विभागाच्या वतीने नुकताच आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त मराठी पत्रकार दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे हे होते. तर कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे म्हणाले की, भारतात २००० सालापासून अनेकांच्या हातात मोबाईल आले, यामुळं सामाजाच्या विचार करण्याच्या पद्धतीमध्ये स्थितांतर होत आहे, तीच स्थितांतर माध्यमांमध्येही आली, चॅनल्स आणि मोबाईल मध्ये अनेकजण बातम्या बघतात, मात्र, वृत्तपत्रांचं महत्व कमी झाले नाही.




आजही अनेकजण सकाळी वृत्तपत्र वाचतात. चौथ्या स्तंभाचं महत्त्व बाळशास्त्री जांभेकर यांच्या काळात होतं तेवढंच आजही आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ मोठं काम करू शकतो. म्हणूनच चौथ्या खांबाचे महत्व अधोरेखित होतं. चांगले पत्रकार गोंडवाना विद्यापीठातुन बाहेर पडावे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शैलेश पांडे यांनी सांगितले की, मुद्रित माध्यमांची पायाभरणी तसेच पत्रकारांमध्ये चौफेर विद्वत्तेच्या परंपरेची पायाभरणी बाळशास्त्री जांभेकर यांनीच केली.

लोकशाहीच्या तीन खांबांना कायदे आहेत, मात्र चवथ्या खांब असलेल्या पत्रकारांसाठी कायदे नाही, विशेषाधिकार नाही, मात्र तरीही त्यांचे योगदान आहे, कारण ही माणसे व्रतस्थ आहेत.असेही ते म्हणाले कार्यक्रमाचे संचालन स. प्रा. डॉ. संजय डाफ यांनी तर आभार स.प्रा. डॉ. सरफराज अन्सारी यांनी केले. प्रस्ताविक स.प्रा.रोहित कांबळे यांनी तर प्रमुख वक्ते यांचा परिचय स. प्रा.चैतन्य शिनखेडे यांनी करून दिला. यावेळी जनसंवाद विभागाच्या समन्वयिका डॉ. रजनी वाढई, स.प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## शिलाबाई अशोकराव खांडेकर यांचे निधन

पुलगाव नजीकच्या नाचणगाव येथील शिलाबाई अशोकराव खांडेकर वय ६७ वर्ष यांचे अकस्मात निधन झाले त्यांचे मागे पती दोन मुले सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे पंचधारा मोक्षधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले शासकीय कंत्राटदार प्रवीण खांडेकर यांच्या त्या आई होत.



# अजय कंकडालवार यांनी जाणून घेतल्या आरेवाडा वासियांच्या समस्या

**भामरागड | प्रतिनिधी**

तालुक्यातील आरेवाडा येथील आविसं, काँग्रेसचे नेते व माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांनी नागरिकांची भेट घेऊन नागरिकांशी संवाद साधत नाली,रस्ते,आरोग्य सुविधा,शिक्षण व गावातील विविध विषयांवार चर्चा करण्यात आली आहे.चर्चा दरम्यान आरेवाडा येथील नागरिकांनी आमच्या समस्या दूर करा म्हणून कंकडालवार यांना चर्चा दरम्यान सांगितले आहे.त्यावेळी कंकडालवार यांनी गावातील प्रत्येक समस्या लवकरात लवकर दूर करण्याचे आश्वासन दिले.यावेळी चर्चा करतांना सुधाकर तिम्मा आविस अध्यक्ष भामरागड,लालसू आत्राम माजी सभापती,शामराव येरकलवार,झुर पुंगाठी,कालू पुंगाठी,जगदीश कोकमुठीवार,सुकाम मडावी माजी सभापती पं.स.,आकाश मोगरकर,प्रवीण मोगरकर,सरिता वाचामी सरपंच ग्रामपंचायत आरेवाडा,रंजना पुंगाठी उपसरपंच ग्रामपंचायत आरेवाडा,निलाबाई कुमरे ग्रामपंचायत सदस्य आरेवाडा,सूनदा लठार ग्रामपंचायत सदस्य,निर्मला सडमेक ग्रामपंचायत सदस्य,बाजीराव तेलामी ग्रामपंचायत सदस्य,विजय कुडयामी,गोविंद चेक्रवर्ती,कार्तिक तोगम माजी उपसरपंच मारपाल्ली,स्वप्नील मडावी,सचिन पांचार्यसह आदी उपस्थित होते.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .